# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १९९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.०६ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## वाल्मिक कराडची नागपूर कारागृहात रवानगी करा, सुप्रिया सुळेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी बीड जिल्हा कारागृहात असलेला मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला नियमबाह्य आणि 'व्हीआयपी' सुविधा दिल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आरोपी वाल्मिक कराडची तातडीने नागपूर मध्यवर्ती कारागृहात रवानगी करावी आणि त्याला मदत करणाऱ्या कारागृह पोलिसांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी ठाम मागणी सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी मुख्य आरोपी वाल्मिक कराड सध्या बीड जिल्हा मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत आहे. मात्र, राजकीय प्रभावाचा वापर करून त्याला तुरुंगात सर्व सुखसोयी पुरवल्या जात असल्याचा अत्यंत गंभीर आरोप संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी कारागृह अधीक्षकांना एक सविस्तर पत्र लिहून तुरुंगातील गैरप्रकारांची पोलखोल केली आहे. याच पत्राचा संदर्भ देत खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारला धारेवर धरले आहे.

## काम सुधारा, नाहीतर विकेट पडणार!; एकनाथ शिंदेंचा ४ मंत्र्यांना सज्जड दम

### मंत्रिमंडळात मोठ्या खांदेपालटाची शक्यता

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीपूर्वी मंत्रालयात पार पडलेल्या शिवसेनेच्या स्वतंत्र बैठकीत मोठी राजकीय घडामोड पाहायला मिळाली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षाच्या चार मंत्र्यांच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत त्यांना थेट पदावरून हटवण्याचा इशारा दिला आहे. जनतेची कामे आणि पक्षवाढीकडे दुर्लक्ष करणाऱ्या या मंत्र्यांना आता आपली कामगिरी सुधारण्यासाठी शेवटची संधी देण्यात आली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांनी झापलेल्या ४ पैकी ३ मंत्र्यांची नावे समोर आली आहेत. यामध्ये सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, वने व मदत पुनर्वसन मंत्री संजय राठोड आणि शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा समावेश असल्याचे समजते. या मंत्र्यांच्या खात्याचा कारभार समाधानकारक नसून, वारंवार सूचना देऊनही त्यांच्या कामात सुधारणा झालेली नाही, अशी खंत शिंदे यांनी बैठकीत व्यक्त केली.

मंत्रालयात मंगळवारी पार पडलेल्या या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. "जनतेची कामे मार्गी लावा, आपल्या मतदारसंघात लक्ष द्या आणि पक्षसंघटनेची वाढ करा. अन्यथा मला खांदेपालट करावा लागेल," अशा स्पष्ट शब्दांत



त्यांनी मंत्र्यांना सुनावले. विदर्भ, वाशीम, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या भागांमध्ये पक्ष वाढीवर विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या कडक सूचना त्यांनी दिल्या आहेत.

पक्षनेतृत्वाकडून दर ३ महिन्यांनी सर्व मंत्र्यांच्या कामगिरीचा एक अहवाल तयार केला जातो. या अहवालात जर संबंधित मंत्र्यांच्या कामाचा आलेख उंचावलेला दिसला नाही, तर आगामी मंत्रिमंडळ विस्तारात त्यांची उचलबांगडी निश्चित मानली जात आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मंत्र्यांसोबतच एकनाथ शिंदे यांनी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (उत्तन, भाईंदर) येथे आयोजित प्रशिक्षण शिबिरात नगरसेवकांचेही कान टोचले. कल्याण-डोंबिवली आणि अंबरनाथ-बदलापूर येथील नगरसेवकांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, "काही जण निवडून आल्यावर वॉर्डाचा सातबारा आपल्या नावावर झाला आहे, अशा थाटात वागतात. तसे वागल्यास पुढच्या निवडणुकीत जनता तुम्हाला घरी बसवते." शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी नगरपिता ऐवजी नगरसेवक हे नाव का दिले, याची आठवण त्यांनी आवर्जून करून दिली.

### बांगलादेशात झालेला उठाव हा नियोजित कट होता-शेख हसीना

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- गेल्या दोन वर्षांनंतर पहिल्यांदाच शेख हसीना यांनी दिल्लीत व्हर्च्युअल पद्धतीने सार्वजनिकरीत्या माध्यमांशी संवाद साधला. यावेळी शेख हसीना यांनी बांगलादेशात २०२४ मध्ये झालेल्या उठावाबाबत आणि मायदेशी परतण्याबाबतच्या निर्णयावर महत्वाचं भाष्य केलं. 'बांगलादेशात झालेला उठाव हा नियोजित सत्तांतर करण्यासाठीचा कट होता, विद्यार्थ्यांचं आंदोलन नव्हतं', असा गंभीर आरोपही शेख हसीना यांनी केला. शेख हसीना यांनी आज नवी दिल्लीतून प्रसारमाध्यमांसमोर आपली व्हर्च्युअल उपस्थिती दर्शवत विविध विषयांवर भूमिका स्पष्ट केली. बांगलादेशात परतण्याबद्दलच्या मुद्यावर बोलताना शेख हसीना यांनी म्हटलं की, 'या वर्षी डिसेंबरपर्यंत ढाक्याला परतण्याचं नियोजन आहे. तिकडे परतल्यावर मला अटक केली जाऊ शकते किंवा कदाचित माझी हत्याही होऊ शकते. मात्र, तरीही, मला जावंच लागेल.'

## शिंदे यांच्यासोबत गेलेले त्यावेळचे आमदार अपात्र, त्या आधारे निवडणूक आयोग अन् राहुल नार्वेकरांचे निर्णय चुकीचे

### ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद, शिवसेना पक्षचिन्हावर आज पुन्हा सुनावणी

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- ज्यावेळी एकनाथ शिंदे हे फुटीर आमदारांसोबत सूरत, गुवाहाटीला गेले त्यावेळी ते भाजपच्या संपर्कात होते. एक महाशक्ती आपल्या पाठीशी असल्याचं शिंदेंनी उघडपणे सांगितलं होतं. ते सातत्याने भाजपच्या संपर्कात होते, त्यांचे हे कृत्य म्हणजे पक्षविरोधी कारवाई होती, असा युक्तिवाद ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. शिंदेंसोबत गेलेले आमदार हे अपात्र असून त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी दिलेला निर्णय हा अवैध असल्याचाही युक्तिवाद सिब्बल यांनी केला.

शिवसेना पक्ष आणि चिन्हावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू झाली असून ठाकरे गटाच्या वतीने कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादावर, निवडणूक चिन्ह हे मूळ पक्षाचे असते की विधिमंडळ पक्षाचे? असा प्रश्न यावेळी सर्वोच्च न्यायालयाने विचारला.

उद्धव ठाकरे शिवसेना प्रमुख असतानाच त्यांनी एकनाथ शिंदे यांची नेता म्हणून निवड केली. पक्षाच्या घटनेनुसार त्याची माहिती निवडणूक आयोगाला दिली होती, असाही युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे आमदार सूरत आणि गुवाहाटीला गेले त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी विधीमंडळ गटाची बैठक घेऊन उद्धव ठाकरे यांनी अजय चौधरी यांची गटनेता म्हणून निवड केली होती, अशी माहिती कपिल सिब्बल यांनी न्यायालयाला दिली.

एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर शिवसेना कुणाची, चिन्ह कुणाचं याचा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला. त्या आधी निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह हे एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिल्यानंतर ठाकरे गटाने त्याला न्यायालयात आव्हान दिलं. त्यावरील सुनावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे.

दहाव्या अनुसूची म्हणजे पक्षांतर बंदी कायद्यानुसार, एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेले सगळे आमदार आपोआप अपात्र ठरतात. तसे झाले नाही तर दहाव्या अनुसूचीचा उपयोग काय? असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

## विद्यार्थ्यांचे गुन्हेगार असल्यानेच अमित शाह तोंड लपवत आहेत

### गृहमंत्री संसदेत येत नसल्याने राहुल गांधींचा हल्लाबोल

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- संसदेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह येत नसल्याने विरोधकांनी मोदी सरकारला चांगलंच घेरलं आहे. जंतर मंतर आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस कारवाईवरून विरोधी पक्षाने सरकारला कोंडीत पकडलं आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात या प्रकरणी उत्तर द्यावे, अशी विरोधी पक्षाची मागणी आहे. राम मंदिरातील लूट, पेलेट गनचा वापर आणि जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा पुन्हा देण्याच्या मुद्द्यावर गृहमंत्री अमित शाह यांच्या प्रतिक्रियेच्या मागणीसाठी विरोधी पक्षांनी आंदोलन केले.

दरम्यान, राहुल गांधी यांनी अमित शाह यांच्यावर हल्ला चढवला आहे. गृहमंत्री विद्यार्थ्यांचे गुन्हेगार असल्याने तोंड लपवत असल्याचा हल्लाबोल राहुल गांधी यांनी ट्विट करत केला. जंतर मंतर आंदोलकांवरील "पोलीस कारवाई", अयोध्या राम मंदिरातील राजरोस लूट आणि इतर मुद्द्यांवरून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या विरोधात निषेध करण्यासाठी विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खासदार प्रियांका गांधी आणि इतर विरोधी खासदारांनी गांधी पुतळ्यापासून मकर द्वारपर्यंत मोर्चा काढला. विरोधी पक्षांनी पंतप्रधान आणि गृहमंत्री यांच्याकडून सभागृहात उत्तरांची मागणी केली आहे.

२० जुलै रोजी जंतर मंतर येथील आंदोलनादरम्यान पेलेट गनचा वापर का करण्यात आला, याचे उत्तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात येऊन द्यावे, अशी भूमिका विरोधी पक्षांनी घेतली आहे.

पेलेट गन वापरण्याची परवानगी कोणी दिली? याशिवाय, राम मंदिरातील चोरीचा मुद्दाही विरोधी पक्ष उपस्थित करत आहेत. विरोधी पक्षाने आपल्या मोर्चादरम्यान एक प्रतिकात्मक दानपेटीही ठेवली. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान आणि गृहमंत्री यांनीही सभागृहात येऊन निवेदन द्यावे, अशी मागणी केली. ते म्हणाले, "पंतप्रधान आणि गृहमंत्री यांनी सभागृहात येऊन उत्तरे दिली पाहिजेत. चर्चा झाल्यास आम्ही सहभागी होण्यास तयार आहोत. केवळ चर्चेतूनच तोडगा निघू शकतो." जर गृहमंत्री उत्तर देणार नाहीत, तर तो सभागृहाचा अपमान मानला जाईल. विरोधी पक्ष चर्चेसाठी तयार आहे, परंतु सत्ताधारी पक्ष त्यापासून पळ काढत असल्याचा टोलाही त्यांनी लगावला.

## महाराष्ट्रात ॲनालॉग पनीरवर बंदी

### तुकाराम मुंढे यांचा निर्णय; नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड केली जाणार नाही

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- कायद्याचं पालन करणाऱ्यांवर भिती बाळगण्याच कारण नाही असे मत राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी व्यक्त केले. राज्यात केवळ दुधाच्या पनीरच्या उत्पादनाला परवानगी असल्याचे ते म्हणाले. कोणालाही व्हीव्हीआयपी ट्रीटमेंट दिलेली नाही. उच्च न्यायालयाने देखील आमच्या कामाची स्तुती केलेली आहे. प्रत्येकाला सुधारणा नोटीस देणं अपेक्षित नाही. ८० टक्के आस्थापना योग्य स्थितीत होत्या त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही असे मुंढे म्हणाले.

विशेष तपासणी मोहिम राबवणार असल्याची माहिती देखील मुंढेंनी दिली. संशयित उत्पादनांचे नमुने घेऊन पुढील कारवाई होईल. सगळ्या अधिकाऱ्यांना कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्राहकांना ओरीजनल पनीर मिळावं पॅकिंगवरील सगळे नॉर्म पाळले गेले पाहिजेत. संशय आल्यास लोकांनी टोल फ्री क्रमांकर तक्रार करावी असेही मुंढे म्हणाले. नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड होणार नाही. ॲनालॉग पनीरवर बंदी आणणारे महाराष्ट्र पहिलं राज्य असू शकेल असेही मुंढे म्हणाले.

सुधारणा नोटीस न देता थेट परवाना रद्द करतो, असं म्हणणं चुकीच आहे आकडेवारी स्पष्ट असल्याचे मुंढे म्हणाले. जिथे फूड सुरक्षित नव्हतं लोकांच्या जीवाला धोका होता तिथेच फक्त परवाना जप्तीची कारवाई झाल्याची माहिती मुंढेंनी दिली. जो कारवाईशी संतुष्ट नाही त्याने माझ्याकडे अपील करायला हवी हेच कायदा सांगतो असंही ते म्हणाले. १६५ पैकी १०३ अपील केलं आहे. उच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय त्यांच्याकडे आहे. आमच्याकडे सगळे पुरावे आहेत फोटो व्हिडिओ आहेत असेही मुंढे यावेळी म्हणाले. कायदेशीर रीत्या आम्ही बरोबर आहोत असेही मुंढे म्हणाले.

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घुले कुटुंबीयांचे आमरण उपोषण

बीड दि.५ (प्रतिनिधी)- बीडमध्ये विलास घुले खून प्रकरणात खासदार बजरंग सोनवणे यांचा मुलगा सौरव सोनवणे याच्यावर घुले कुटुंबाने गंभीर आरोप केले आहेत. सौरव सोनवणेच्या अटकेच्या मागणीसाठी घुले कुटुंबाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. माझ्या मुलाला न्याय द्या, सौरभ बजरंग सोनवणे याला अटक करा, अन्यथा आम्ही इथंच आत्महत्या करू, असा टोकाचा इशारा मयत विलास घुलेच्या आईसह भावाने दिला आहे. तर घुलेच्या टाकळी गावच्या सरपंचाने देखील आक्रमक पवित्रा घेतला असून जोपर्यंत घुले कुटुंबाला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही इथून उठणार नाहीत, असा पवित्रा घेतलाय.

## पंतप्रधान मोदींचा व्हिडीओ हटवल्याप्रकरणी मार्क झुकरबर्ग यांनी मागितली माफी

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक व्हिडीओ फेसबुकवरुन काही वेळासाठी हटवल्याप्रकरणी वाद निर्माण झाला होता. या प्रकरणी संसदीय समितीची बैठक पार पडली होती. या बैठकीला मेटाचे काही अधिकारीही उपस्थित होते. त्यानंतर संसदीय समितीने 'मेटा'चे प्रमुख मार्क झुकरबर्ग यांना तीन दिवसांचा अल्टीमेटम देत बिनशर्त माफी मागण्यास सांगितलं होतं.

तसेच मार्क झुकरबर्ग यांनी माफी मागितली नाही, तर भारतात मेटाला माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत मिळणारे कायदेशीर संरक्षण मागे घेण्याचा इशाराही देण्यात आला होता. या प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. पंतप्रधान मोदींच्या व्हिडीओवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर आणि 'मेटा'कडून इतर झालेल्या चुकांबद्दल आता मार्क झुकरबर्ग यांनी माफी मागितल्याचा दावा सरकारी सूत्रांकडून करण्यात आला आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

पंतप्रधान मोदींचा व्हिडीओ हटवल्याच्या प्रकरणासह डीपफेक सामग्री होस्ट करणं, बाल लैंगिक शोषणाच्या सामग्रीसह आदी इतर त्रुटींबद्दल झालेल्या चुकांच्या पार्श्वभूमीवर मार्क झुकरबर्ग यांनी माफी मागितली असल्याची माहिती सरकारी सूत्रांनी बुधवारी दिली असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. मात्र, याबाबत मेटाकडून अद्याप अधिकृत निवेदन समोर आलेलं नाही.

माहिती तंत्रज्ञानविषयक संसदीय स्थायी समितीची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत गृह मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि मेटासह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांना संबोधित करणारा व्हिडीओ ५ ते ६ तास फेसबुकवर उपलब्ध नव्हता, या मुद्द्यावरून समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. लोकसभेच्या संचालक ए.जोतिर्मयी यांनी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस.कृष्णन यांना पाठवलेल्या पत्रात या घटनेची गंभीर दखल घेण्यात आल्याचं म्हटलं होतं.

## मुख्यमंत्र्यांनी ३ वर्षांपूर्वी उद्घाटन केलेला पूल गेला वाहून; ठेकेदारावर गुन्ह्याची मागणी, रोहित पवारांची खोचक टीका

गडचिरोली दि.५ (प्रतिनिधी)- पावसाळा आला की रस्त्यावरील खड्डे आणि विविध भागातील पुलांच्या विदारक स्थितीचे चित्र पाहायला मिळते. तसेच, संबंधित बांधकाम किंवा कामाच्या ठेकेदारांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उभे राहतात. काही दिवसांपूर्वी मुसळधार पावसामुळे मिसिंग लिंकजवळ दरड कोसळल्याने मोठा राजकीय वादंग झाल्याचंही पाहायला मिळालं. त्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात स्पष्टीकरण देखील दिले होते. आता, मुख्यमंत्री तथा गडचिरोलीचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तीन वर्षांपूर्वी उद्घाटन झालेला कोठी-कोरणार पूल पुरामुळे खचला तर काही भागच वाहून गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यावरुन, विरोधी पक्षातील नेत्यांनी पुन्हा एकदा शासनाच्या कामावर प्रश्न उपस्थित केले आहेत.

कोठी-कोरणार पुलाचा काही भाग वाहून गेल्याने येथील वाहतूक बंद पडली आहे, या प्रकारामुळे गडचिरोली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारलेला पूल इतक्या कमी कालावधीत निकामी झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. १५ ऑगस्ट २०२३ रोजी त्यावेळचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि त्यावेळचेच अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या उपस्थितीत या पुलाचे उद्घाटन झाले होते. क्रांतिवीर बाबुराव शेडमाके असे या पुलाला नाव देण्यात आले होते. मात्र, तीन वर्षांतच पूल खचल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण, तांत्रिक देखरेख आणि कंत्राटी व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## सुनेत्रा पवारांवरील टीकेचे राज्यभर पडसाद; नाशकात काँग्रेस-राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आमनेसामने

नाशिक/नागपूर दि.५ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर काँग्रेसने केलेल्या गुंगी गुडिया या टीकेचे आता राज्यभर तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. मुंबई आणि पुण्यापाठोपाठ नाशिक व नागपूरमध्येही राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. नाशिकमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते थेट आमनेसामने आल्याने मोठा तणाव निर्माण झाला होता. यावेळी राष्ट्रवादीकडून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात चप्पल मारो आंदोलन करण्यात आले.

नाशिक शहरात सुनेत्रा पवार यांच्यावरील टीकेचा निषेध नोंदवण्यासाठी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकवटले. आमदार सरोज अहिरे, जिल्हाध्यक्ष दिलीप खैरे आणि शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस कार्यालयाकडे जाण्याचा प्रयत्न केला.

याच वेळी काँग्रेसचे कार्यकर्तेही आक्रमक पवित्रा घेत रस्त्यावर उतरले. दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आमनेसामने आल्याने मोठा गोंधळ उडाला. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने पोलिसांना वेळीच मध्यस्थी करावी लागली. चोख पोलीस बंदोबस्त आणि मध्यस्थीमुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, संतप्त राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्या पोस्टरला चपला मारून आपला तीव्र निषेध नोंदवला.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावरील काँग्रेसच्या वक्तव्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसने मंत्रालयाबाहेर मूक आंदोलनाची हाक दिली होती. मात्र आंदोलन सुरू होण्यापूर्वीच पोलिसांनी मंत्रालय परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना अडवले. दरम्यान, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात घोषणाबाजी करत निषेध नोंदवला. नाशिकप्रमाणेच नागपुरातही राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक झालेली पाहायला मिळाली. नागपुरातील मध्यवर्ती असलेल्या व्हेरायटी चौकात राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसविरोधात जोरदार निदर्शने केली. संपूर्ण राज्यभरात राष्ट्रवादीकडून काँग्रेसच्या या भाषेचा निषेध नोंदवला जात आहे.

## ई२० इंधनाबाबतचा आक्षेपार्ह मजकूर, एआय व्हिडीओ हटवण्याचे न्यायालयाचे आदेश

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- देशात नव्याने लागू झालेले इथेनॉल धोरण आणि इथेनॉलमिश्रित इंधनासंदर्भात सुरु असलेल्या वादावरुन सोशल मीडियावर नेटकऱ्यांच्या टीकेचे लक्ष्य ठरत असलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. गेल्या काही दिवसांत सोशल मीडियावर नितीन गडकरी यांच्याबद्दल मोठ्याप्रमाणावर व्हिडीओ आणि इतर मजकूर पसरवण्यात आला होता. याविरोधात नितीन गडकरी यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत मेटा, गुगल, एक्स या समाजमाध्यमांवरील सगळा मजकूर हटवण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. काही दिवसांपूर्वीच उच्च न्यायालयाने नितीन गडकरी यांची ही याचिका दाखल करुन घेतली होती. बुधवारी न्यायालयात या प्रकरणावर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने इथेनॉलमिश्रित इंधनासंदर्भात सुरु असलेल्या वादाशी निगडित एआय जनरेटेड कथित बदनामीकारक डीपफेक व्हिडिओ तसेच छेडछाड करण्यात आलेला डिजिटल कंटेंट हटवण्याचे निर्देश सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना दिले आहेत. न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या एकलपीठाने हा निकाल दिला आहे.

## राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार; पुणे, रायगडसह विदर्भातील अनेक जिल्ह्यांना येलो अलर्ट

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- विश्रांती घेतलेल्या पावसाने राज्यात पुन्हा एकदा जोरदार कमबॅक केले आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या ताज्या अंदाजानुसार, राज्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. पुणे आणि रायगड जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून, या भागांसाठी आज ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

तसेच नाशिक, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूरसह पूर्व विदर्भातील गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सूनचा कमी दाबाचा पट्टा सध्या चांगलाच सक्रिय झाला आहे. बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. यासोबतच, ईशान्य राजस्थानपासून ते दक्षिण कर्नाटकापर्यंत ५.८ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. यामुळे राज्यात पावसाला पोषक असे वातावरण तयार झाले आहे. यंदाच्या एल निनोचा कोणताही विपरित परिणाम मान्सूनवर झालेला नाही.

यंदा जून महिन्यात पावसाने ओढ दिली होती, मात्र जुलैमध्ये झालेल्या दमदार पावसानंतर आता ऑगस्ट महिनाही पावसासाठी दिलासादायक ठरत आहे. राज्याच्या विविध भागात सुरू असलेल्या या पावसामुळे बरीचशी धरणे तुडुंब भरली असून, पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा मोठा प्रश्न मार्गी लागलाआहे. हा पाऊस खरिपाच्या पिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. तिलारी धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू असल्याने धरणाच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे. तिलारी नदीला आलेल्या पुरामुळे घोटगे परमे, घोटगेवाडी आणि कुडासे यांसह परिसरातील पुलांवर आणि कॉजवेवर पाणी आले आहे. परिणामी, नदीकाठच्या अनेक गावांचा तालुक्याशी असलेला संपर्क पूर्णपणे तुटला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.

विदर्भातील भंडारा जिल्ह्याला आज येलो अलर्ट देण्यात आला आहे. गेल्या चार दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने भंडाऱ्याच्या तुमसर तालुक्यात आणि ग्रामीण भागात प्रचंड उकाडा वाढला होता. मात्र, पावसाने पुन्हा हजेरी लावल्याने सिंचनाची सोय नसलेल्या आणि पावसाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस मोठा आधार ठरला आहे. दुसरीकडे, नाशिक जिल्ह्यातही पावसाची समाधानकारक रिपरिप सुरू आहे.

## विमा नाही, तर पेट्रोल नाही! सर्वोच्च न्यायालयाने केली महत्वाची शिफारस

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- देशभरात विमाविना धावणाऱ्या वाहनांवर आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. वैध थर्ड पार्टी विमा नसलेल्या वाहनांना पेट्रोल पंपावर इंधन नाकारण्याची व्यवस्था करण्याबाबत पथदर्शी (पायलट) प्रकल्प राबविण्याची शिफारस न्यायालयाने केली आहे. यासाठी विमा नियामक प्राधिकरण (आयआरडीएआय) आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने संयुक्तपणे योजना तयार करावी, असे निर्देश न्यायालयाने दिले. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय देताना हा सक्तीचा आदेश नसून धोरणात्मक शिफारस असल्याचेही स्पष्ट केले.

रस्ते सुरक्षेला बळकटी देण्यासाठी विद्यमान एएनपीआर (ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन) कॅमेरे विमा माहिती केंद्र आणि 'वाहन' पोर्टलशी जोडण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. यामुळे विमाविना धावणाऱ्या वाहनांना स्वयंचलित ई-चलन पाठविता येईल. तसेच राज्य पोलिसांना विम्याची माहिती तात्काळ तपासता येईल, अशी मोबाईल ॲप किंवा हँडहेल्ड उपकरणे उपलब्ध करून देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, राष्ट्रीय महामार्गांवरील टोल नाक्यांवर वाहन न थांबवता स्वयंचलित ओळख प्रणालीचा पथदर्शी प्रयोग करण्याचाही सल्ला न्यायालयाने दिला.

# मराठवाड्यात पावसाची कृपादृष्टी; पिकांना नवसंजीवनी, शेतकऱ्यांना दिलासा

मराठवाड्यात समाधानकारक सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जायकवाडी धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढल्याने पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनाचीही चिंता कमी झाली आहे. पावसामुळे पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातील तीनशे गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. जायकवाडी धरण ६७.९९ टक्के भरले असून पावसाचा जोर आणखी कायम राहिल्यास भविष्यात पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. नाशिक जिल्ह्यासह गोदावरी नदीच्या वरील भागातील पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला. त्यामुळे हजारो गावांसाठी लाभदायक असलेल्या जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. मागील महिन्याभरात झालेल्या पावसामुळे जायकवाडी धरणात २५ टीएमसी पाण्याची भर पडली आहे. मान्सूनच्या सुरुवातीला जायकवाडी धरणातील पाणीसाठा संपल्यात जमा होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात चिंता व्यक्त केली जात होती; परंतु जुलै महिन्यात नाशिकसह गोदावरीच्या वरील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे जायकवाडी धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू असल्यामुळे पिकांना देखील नवसंजीवनी मिळाली आहे. मध्यंतरीच्या काळात मराठवाड्यातील काही जिल्ह्यात पाऊस गायब झाल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

पाऊस नसल्यामुळे शेतकरी चिंतेत होते. गेल्या आठ दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात समाधानकारक पाऊस सुरू आहे. अलीकडच्या पावसामुळे मराठवाड्यातील पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवात जीव आला आहे. मराठवाड्यात येत्या दोन दिवसांत जोरदार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात २४ तासांत ८९ मंडळात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३७, जालना जिल्ह्यातील २४ आणि बीड जिल्ह्यातील २८ मंडळांचा यामध्ये समावेश आहे. या तीन जिल्ह्यांत पावसाचा जोर कमी असल्याने आगामी काळातील पर्जन्यमानावर धरणांमध्ये जमणारा जलसाठा आणि पाणीसाठ्याचे भवितव्य अवलंबून आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भावसिंगपुरा, बालानगर, लोहगाव, पाचोड, विहामांडवा, गाजगाव, आसेगाव, सिद्धनाथ, वडगाव, करंजखेड, नाचनवेल, जरंडी, बनोटी या ठिकाणी दहा मिलिमीटर पेक्षा अधिकचा पाऊस झाला, तर बीड जिल्ह्यातील पिंपळनेर, गेवराई, धोंडराई, गंगाम सला, नांदुर घाट, हनुमंत पिंपरी, केज, नागापूर या ठिकाणी देखील जवळपास १५ मिलिमीटरपेक्षा अधिकचा पाऊस झाला. त्यापैकी नांदूरघाट येथे सर्वाधिक ३० मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद आहे. जालना जिल्ह्यात भोकरदन तालुक्यात ४.२ तसेच जाफराबाद ३.९, जालना २.२, अंबड ४.८, परतुर २.८, बदनापूर १.६, घनसांगवी ३.८ आणि मंठा ०.९ मिलिमीटर पाऊस गेल्या २४ तासांत झाला. जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाल्याने छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची गरज भागली जाणार आहे. याबरोबरच या धरणातून जवळपास ३०० गावांना पाणीपुरवठा होतो. तसेच औद्योगिक वापरासाठी वर्षभर पुरेल एवढा पाणीसाठा सध्या जायकवाडी धरणात उपलब्ध झाला आहे.

नांदेड, परभणी, हिंगोली या तीन जिल्ह्यांत गेल्या दोन दिवसांपासून मोठा पाऊस सुरू आहे. त्यामुळे शेतकरी देखील समाधानी आहेत. पिकांना जीवदान मिळाल्यामुळे दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर येणार नाही हे मात्र निश्चित आहे. लातूर तसेच धाराशिव जिल्ह्यातही चांगला पाऊस सुरू आहे. एकंदरीत मराठवाड्यातील पिकांची परिस्थिती समाधानकारक मानली जात आहे. शेतकरी समाधानी असून खरीप हंगामासाठी सिंचनाची उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्याची भविष्यातील गरज लक्षात घेता पाण्याची आवक वाढल्यास संपूर्ण मराठवाड्याची चिंता मात्र नक्कीच मिटणार आहे.

संपूर्ण मराठवाड्यात येत्या दोन दिवसांत मुसळधार पाऊस पडणार आहे. नांदेड व लातूर जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे, तर हिंगोली, परभणी, जालना, बीड, धाराशिव या जिल्ह्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

शुक्रवार आणि शनिवारपर्यंत नांदेड, लातूर, बीड जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मान्सूनच्या सुरुवातीला मराठवाड्यातील पिकांबद्दल चिंता व्यक्त केली जात होती. शेतकऱ्यांचे संपूर्ण आयुष्यमान शेती आणि पिकांवर अवलंबून असते. निसर्गाने कृपा केली तर शेतकरी ताठ मानेने जगू शकतो; परंतु निसर्गाची अवकृपा झाली तर शेतकऱ्यांच्या हातातील पिके निघून जातात. त्यामुळे संपूर्ण बाजारपेठेवर त्याचा परिणाम होतो.

अलीकडच्या वातावरणामुळे तसेच पावसामुळे मराठवाड्यातील पिके तरारली आहेत. सध्याच्या परिस्थितीला तरी पिकांसाठी आवश्यक असलेला पाऊस पडलेला असल्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी समाधानी आहे. पावसामुळे पिकांना जीवदान तर मिळाले पण आणखी मोठा पाऊस झाला तर मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे मिटणार आहे. तसेच जनावरांसाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्नही भविष्यातील पावसामुळे सुटू शकतो.

# स्वीय सहायक : लोकशाहीतील अदृश्य पण अत्यंत महत्त्वाचा दुवा

**लोकशाही** ही केवळ निवडणुकांवर उभी नसते, तर ती सतत चालणाऱ्या संवाद, समन्वय आणि उत्तरदायित्वाच्या प्रक्रियेवर उभी असते. मतदार आपल्या प्रतिनिधीला निवडून देतो, परंतु त्या प्रतिनिधीपर्यंत नागरिकांच्या समस्या, अपेक्षा आणि प्रशासनाच्या विविध स्तरांवरील माहिती पोहोचविण्याचे काम कोण करतो? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे स्वीय सहायक. दुर्दैवाने भारतीय राजकीय व्यवस्थेत स्वीय सहायकाच्या भूमिकेबाबत फारशी चर्चा होत नाही. अनेकदा त्याला केवळ फोन उचलणारा, भेटी ठरविणारा किंवा कार्यालयीन कर्मचारी म्हणून पाहिले जाते. प्रत्यक्षात स्वीय सहायक हा लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यातील विश्वासाचा, प्रशासनाशी सम न्वयाचा आणि कार्यालयीन कार्यक्षमतेचा अत्यंत महत्त्वाचा दुवा असतो.

आज लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या पूर्वीपेक्षा अनेक पटींनी वाढल्या आहेत. मतदारसंघातील विकासकामे, शासनाच्या योजना, नागरिकांच्या तक्रारी, सामाजिक म ाध्यमांवरील संवाद, विविध विभागांशी समन्वय, कायदेविषयक तयारी, कार्यक्रमांचे नियोजन, माध्यमांशी संपर्क आणि जनसंपर्क अशा असंख्य जबाबदाऱ्यांमध्ये एकट्या लोकप्रतिनिधीला सर्व बाबींकडे लक्ष देणे शक्य नसते. अशावेळी स्वीय सहायक हा केवळ सहाय्यक राहत नाही, तर तो लोकप्रतिनिधीच्या कार्यपद्धतीचा 'व्यवस्थापक' बनतो. स्वीय सहायकाचे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे माहितीचे व्यवस्थापन. एखाद्या नागरिकाची समस्या, शासनाचा नवीन निर्णय, एखाद्या विभागाची कागदपत्रे किंवा विकासकामांचा अहवाल योग्य वेळी आणि योग्य स्वरूपात लोकप्रतिनिधीसमोर ठेवणे ही मोठी जबाबदारी आहे. चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास निर्णयही चुकीचा होऊ शकतो. त्यामुळे माहितीची सत्यता, अचूकता आणि वेळेचे भान हा स्वीय सहायकाचा मूलभूत गुण असला पाहिजे.

दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे प्रशासनाशी समन्वय. शासनाचे प्रत्येक कार्यालय नियम, प्रक्रिया आणि वेळापत्रकानुसार काम करत असते. नागरिकांच्या समस्या सोडविताना संबंधित विभागाशी सातत्याने संपर्क ठेवणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे, प्रकरणांचा पाठपुरावा करणे आणि कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे हे सर्व स्वीय सहायकाच्या कार्यकुशलतेवर अवलंबून असते. अनेकदा नागरिकांना वाटते की लोकप्रतिनिधीने काम केले, परंतु त्या कामामागे सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या स्वीय सहायकाचे श्रम दडलेले असतात. आजच्या डिजिटल युगात संवाद कौशल्य हे स्वीय सहायकासाठी अत्यावश्यक झाले आहे. सामाजिक माध्यमांमुळे प्रत्येक नागरिक थेट लोकप्रतिनिधीशी संवाद साधू इच्छितो.




हजारो संदेश, ई-मेल, फोन आणि भेटी यांचे व्यवस्थापन करताना कोणती बाब तातडीची, कोणती महत्त्वाची आणि कोणती नियमित आहे याचे योग्य वर्गीकरण करणे आवश्यक असते. संवादात संयम, नम्रता आणि स्पष्टता नसेल तर लोकप्रतिनिधीची प्रतिमाही बाधित होऊ शकते.

स्वीय सहायकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वेळेचे व्यवस्थापन. एका दिवसात अनेक कार्यक्रम, बैठका, शासकीय कार्यालयांच्या भेटी, पत्रकार परिषद, जनसंपर्क दौरे आणि वैयक्तिक भेटी यांचे नियोजन अचूक असणे आवश्यक असते. वेळेचा अपव्यय म्हणजे लोकप्रतिनिधीच्या कार्यक्षमतेवर परिणाम. त्यामुळे प्रत्येक मिनिटाचा योग्य उपयोग करून कार्याचे प्राधान्यक्रम ठरविणे ही कला स्वीय सहायकाने आत्मसात केलेली असावी. लोकशाही व्यवस्थेत गोपनीयता आणि विश्वासार्हता या दोन मूल्यांना विशेष महत्त्व आहे. अनेक संवेदनशील कागदपत्रे, राजकीय रणनीती, प्रशासकीय निर्णय, वैयक्तिक माहिती आणि गोपनीय चर्चा स्वीय सहायकाच्या माध्यम ातून हाताळल्या जातात. त्यामुळे प्रामाणिकपणा, नैतिकता आणि गोपनीयतेचे पालन हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग असला पाहिजे. माहितीचा गैरवापर किंवा वैयक्तिक फायद्यासाठी प्रभावाचा वापर केल्यास केवळ लोकप्रतिनिधीच नव्हे, तर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत होतो. आज अनेकदा अशी टीका होते की काही स्वीय सहायक स्वतःलाच लोकप्रतिनिधी समजू लागतात. नागरिकांशी उद्धट वर्तन, आर्थिक व्यवहारांमध्ये हस्तक्षेप, शासकीय अधिकाऱ्यांवर अनावश्यक दबाव किंवा अधिकाराचा गैरवापर अशा घटना लोकशाहीच्या दृष्टीने धोकादायक आहेत. स्वीय सहायक हा लोकप्रतिनिधीचा प्रतिनिधी असू शकतो, परंतु तो लोकप्रतिनिधी नसतो. त्याचे अधिकार आणि जबाबदाऱ्या यामध्ये स्पष्ट मर्यादा असणे आवश्यक आहे. अधिकारापेक्षा कर्तव्याची जाणीव अधिक महत्त्वाची आहे. स्वीय सहायकाला संविधान, शासनरचना आणि प्रशासकीय प्रक्रिया यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. शासनाच्या योजना, विभागीय कार्यपद्धती, कायदेशीर बाबी, निधीची प्रक्रिया आणि लोकप्रतिनिधींचे अधिकार यांचे ज्ञान असल्यास नागरिकांना योग्य मार्गदर्शन करता येते. अन्यथा चुकीची माहिती देऊन नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जातात.

एक चांगला स्वीय सहायक हा केवळ कार्यालय चालवत नाही, तर जनतेचा विश्वास जपतो. त्याच्या वागणुकीवरूनच अनेक नागरिक लोकप्रतिनिधीची प्रतिमा तयार करतात. कार्यालयात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आदराने वागविणे, समस्या शांतपणे ऐकून घेणे, शक्य तितकी मदत करणे आणि प्रामाणिकपणे वस्तुस्थिती सांगणे हीच खरी लोकसेवा आहे. लोकप्रतिनिधीपर्यंत पोहोचण्यापूर्वी नागरिकाचा पहिला संपर्क स्वीय सहायकाशीच येत असल्याने तो लोकशाहीचा पहिला चेहरा ठरतो. भारतीय राजकारणात स्वीय सहायकाच्या भूमिकेला अद्याप संस्थात्मक मान्यता आणि व्यावसायिक ओळख मिळालेली नाही. अनेकजण अनुभवाच्या आधारे हे काम करतात, परंतु बदलत्या काळात प्रशासन, तंत्रज्ञान, संवाद, दस्तऐवजीकरण, कायदे, जनसंपर्क आणि डिजिटल व्यवस्थापन यामध्ये सातत्याने अद्ययावत राहणे गरजेचे आहे. कारण आजचा स्वीय सहायक हा फक्त कार्यालयीन कर्मचारी नसून माहिती व्यवस्थापक, समन्वयक, जनसंपर्क अधिकारी, वेळ व्यवस्थापक आणि लोकशाही प्रक्रियेचा सक्रिय घटक आहे.

लोकशाही मजबूत करायची असेल तर केवळ सक्षम लोकप्रतिनिधी पुरेसे नाहीत, तर त्यांच्यासोबत सक्षम, प्रामाणिक, संवेदनशील आणि अभ्यासू स्वीय सहायकांचीही गरज आहे. लोकप्रतिनिधीच्या यशामागे अनेकदा अशा व्यक्तींचे निःशब्द योगदान असते. त्यामुळे या भूमिकेकडे केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर लोकसेवेची जबाबदारी म्हणून पाहिले पाहिजे. शेवटी, स्वीय सहायक ही पदवी नसून विश्वास, समर्पण, कार्यकुशलता आणि उत्तरदायित्व यांची परीक्षा आहे.

जो स्वीय सहायक नागरिकांच्या वेदना समजून घेतो, प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधतो, लोकप्रतिनिधीचा वेळ आणि प्रतिमा जपतो तसेच संविधानिक मूल्यांशी प्रामाणिक राहतो, तोच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा अदृश्य शिल्पकार ठरतो. लोकप्रतिनिधींच्या यशामागील हा शांत, संयमी आणि कार्यक्षम चेहरा अधिक सक्षम झाला, तर लोकशाहीही तितकीच अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख बनेल.

**– प्रविण बागडे**
नागपूर

# सरकारचे ईपीएस-९५ पेंशन धारकांवरील दुर्लक्ष म्हणजे जेष्ठ नागरिकांची खुली थट्टाच!

२०१४ पासून ईपीएस पेंशन धारक फक्त जगण्याइतकी इतकी पेन्शनची मागणी करीत आहे. परंतु सरकार प्रत्येक अधिवेशनात डोळे बंद करून फक्त तमाशा पहात आहे.जेष्ठ नागरिक ईपीएस पेंशन धारक कमीत कमी ७५०० पेंशन व महागाई भत्ता मिळावा यासाठी वृध्दापकाळात सुध्दा संघर्ष करीत आहे.परंतु सरकारच्या नाकावरील माशी सुद्धा उडतांना दिसत नाही हे जेष्ठांच्या प्रती दुर्भाग्य म्हणावे लागेल.सरकार निवडणुकीच्या काळात मतदारांना लॉलीपॉप देवून अनेक मोफत योजना अंमलात आणते.परंतु देशाचा शिल्पकार कामगार वर्ग फक्त जगण्याइतकी पेन्शनची मागणी करते तेव्हा सरकार प्रत्येक अधिवेशनात पाठ फिरवितांना दिसते.देशात वाढती महागाई,वाढता औषधोपचार, वाढते कर आणि वाढत्या प्रदूषणामुळे वृध्दापकाळातील ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला असुन ग्रस्त आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही.त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही ईपीएस पेंशन धारक आनंदाने करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री ,खासदार,आम दार, प्रशासकीय विभाग यांना निवेदनाच्या माध्यम ातून सरकारपर्यंत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या पावसाळी अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील करोडो वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही पावसाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही. ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा, संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे. केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे.ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मि निमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत, मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या पावसाळी अधिवेशनात दिसून आले. आज देशातील करोडो ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे. सरकार महागाई वाढवीते तेव्हा कोणाचाही विचार न करता भरमसाठ महागाई वाढविते आणि ईपीएस पेंशन धारक फक्त ७५०० रूपये पेन्शन मागते तेव्हा सरकार पाठ फिरविते ही कुठली लोकशाही म्हणावी.आज सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते आहे.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या पावसाळी अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत करोडो ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षांच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या 'म्हारपणाची शीदोरी' आहे. त्यामुळे पेन्शन हे 'जीवन-मरणाचे' साधन सुध्दा आहे. याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागू करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नांवर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४५ कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी करोडो पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा 'अरबो रूपया' सरकारजवळ आहे हा पैसा सरकार 'लोकप्रतिनिधीच्या' पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना 'भिक' दील्यासारखी पेंशन देत आहे. ही 'लोकशाहीला' काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दु:ख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की राजकीय पुढाऱ्यांचे पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही 'देर आज दुरूस्त आए' ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले.तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. पावसाळी अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न करोडो पेन्शन धारकांपुढे उपस्थित होतो.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की 'आपलाच पैसा आपणच चोर'. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की 'जगावे की मरावे'अशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत. त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस-९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल. पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे. त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा 'शिल्पकार' आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,सम ान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली.त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत.परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या करोडो पेंशन धारकांना आहे.सरकारला यावर काहीच निर्णय घ्यायचा नसेल तर ईपीएस पेंशन धारकांना सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी याचेही आम्ही स्वागत करू.जय हिंद!जय भारत.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**

# सावधान! राज्यासह देशात अतीवृष्टीचे रौद्ररूप पहाता; संभाव्य दुर्घटनांपासून स्वत:ला सांभाळा

**सध्याच्या** परिस्थितीत देशातील बहुतांश राज्यांमध्ये अतीवृष्टीमुळे अनेक ग्रामीण भाग, शहरी भाग व अती दुर्गम भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते सोबतच मानवीय,वित्तीय व पशुंची हाणी मोठ्या प्रमाणात होत आहे. याकरीता प्रत्येकांनी सावधगिरीचे उपाय म्हणून नदी-नाले,तलाव,डोह,रोडचे खड्डे व रोडची वळणे यापासून सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.देशात सध्याच्या परिस्थितीत एक-दोन दिवस एकसारखा पाऊस आला की, संपूर्ण परिसर जलमग्न होतो आणि त्याचे दुष्परिणाम मानव,पशुपक्षी व वित्तीय हाणीच्या रूपात सर्वांनाच भोगावे लागते.याचे मुख्य कारण म्हणजे देशातील मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड होय. आज जंगलतोडीमुळे हवामानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते याचा परिणाम निसर्गावर तर होतच आहे.परंतु मानवाच्या आरोग्यावर सुध्दा मोठा आघात करीत आहे.त्यामुळे देशात वाढती ढगफुटी, सुनामी, भुकंप, अती पाऊस, अती उष्णता इत्यादी अनेक नैसर्गिक आपदांचा सामना संपूर्ण जीवसृष्टीला करावा लागतो आहे.कारण वाढते सिमेंट रोड,शहरीकरण,औद्योगिकरण इत्यादींमुळे अनेक कारणांमुळे गावखेडे नष्ट होत आहेत.आज प्रत्येक शहराच्या केंद्रस्थानापासुन २० किलोमीटरपर्यंत शहराचे जाळे पसरल्याचे दिसून येते. यामुळे पाऊसाचे पाणी जमिनीत न जाता सरळ नदी-नाल्यांना,तलाव,धरण यांना जाऊन मिळते व अशा परिस्थितीत सर्वत्र पुरपरिस्थिती निर्माण झालेली दिसून. त्याचप्रमाणे शहरी भागात सिमेंट रोड झाले खरे पण ड्रेनेज सिस्टीमचा अभाव असल्याने राज्यासह देशातील अनेक शहर जलमग्न होतांना दिसतात व शहरात पुरपरिस्थिती निर्माण होते.असे अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत आणि त्याचे परिणाम भोगत सुध्दा आहोत.कारण देशातील अनेक राज्यात पावसाचे थैमान;पूर-भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. आताही महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली जात आहे यामुळे ७ जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.नुकत्याच झालेल्या विदर्भातील तुफान पावसामुळे सहा जणांचा मृत्यू झाला. यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा-लोणी मार्गावरील कुपटी नदीच्या पुलावरून कार वाहून गेल्याने आईसह दोन मुलींचा मृत्यू झाला.भंडारा आणि वर्ध्यात प्रत्येकी एक वाहून गेल्याने दगावले, बुलढाण्यात भिंत कोसळून महिला दगावली, भिवंडी शहरातील भोईवाडा गंगाराम वाडी परिसरातील 'कोहिनूर'ही धोकादायक इमारत कागदी पत्याच्या बंगल्यासारखी गुरुवारी रात्री कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत १० लोकांचा मृत्यू झाला.अशाप्रकारे राज्यात अती पावसामुळे आतापर्यंत ७६ जणांचा मृत्यू झाला तर ८१ जण गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते.म्हणजे आपण ज्याप्रमाणे निसर्गावर अत्याचार करीत आहोत त्याच्या दुप्पट तो पावसाच्या रूपात रौद्र रूप धारण करून संपूर्ण सृष्टीवर घणाघाती प्रहार करीत आहे आणि याला दोषी आपणच म्हणजे संपूर्ण मानवजाती आहे.आज वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात केल्याचे सांगितले जाते.परंतु ८० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असल्याचे दिसून येते.कारण आपण हजारो एकर जमीनीवरील वृक्ष कटाई केली आणि त्याठिकाणी उद्योग धंदे, शहरीकरण,खाणी, औद्योगीकरण,रस्त्यांचे जाळे विणले मग वृक्षारोपण कुठे केले?जर वृक्षारोपण केले तर पाणी जमिनीत का मुरत नाही याचाही अभ्यास सरकारने करायला हवा. राजकीय पुढारी एक वृक्ष लावते आणि फोटो काढून मिडिया समोर फोटोसेशन करते ही कसली वृक्षलागवड म्हणायची! याला वृक्षलागवड म्हणता येणार नाही तर हा फक्त ड्रामा म्हणावा लागेल. आजही राज्यासह देशातील अनेक भागात बंजार जमीन किंवा पडीत जमीन आहे.त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायलाच पाहिजे आणि त्या वृक्षांची जोपासना सुध्दा व्हायला पाहिजे.तेव्हा अती पाऊसाचा ओघ थांबविता येईल असे मला वाटते.कारण राज्यासह देशात युध्दपातळीवर वृक्षलागवड झाली नाही तर येणाऱ्या काळात अती पाऊस,अती उष्णता, सुनामी, भुकंपा सारखे महाभयंकर प्रकार रौद्ररूप धारण करून मोठ्या प्रमाणात मानवी, वित्तीय व पशुपक्षांची हाणी पोहचवू शकते यालाही नाकारता येत नाही.


अती पावसामुळे दऱ्याखोऱ्यात, ग्रामीण भागात,अती दुर्गम भागात विषेली साप निघतात अशीच घटना ठाण्यामध्ये ग्रामीण भागात घडली गावापासून मुख्य रस्त्याला लागण्यासाठी पक्का रस्ताच नसल्याने डोली करून दऱ्याखोऱ्यांतून पायवाटेने ५ कि.मी.वरील रूग्णालयात डोलीतून घेऊन जातांना चौथीत शिकणाऱ्या ९ वर्षीय मुलाचा झोपेत साप चावल्याने दुर्दैवी मृत्यू झाला अशा भयावह घटना अती पाऊसामुळे होत आहे. राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानंतर शनिवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाला.मात्र गेल्या दोन-तीन दिवसांत घाटमाथा, कोकण, पुणे, सातारा, नाशिक, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत जोरदार पाऊसाने सर्वत्र तारांबळ उडाली.

आता पाऊस जरी ओसरला असला तरी १५ तारखेनंतर पाऊसाचा जोर जास्त वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे त्यामुळे सर्वांनीच नदी-नाले,तलाव, धरणे,डोह, दऱ्याखोऱ्यापासुन सावध रहाने गरजेचे आहे.हवामान खात्याने असेही वर्तवले आहे की,पुढील चार दिवसाकरीता विदर्भासह महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाच्या बाबतीत रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे म्हणजे अती पाऊसाचा धोका अजुन पर्यंत टळलेला नाही.देशात अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे.यात उत्तराखंड, छत्तीसगड,केरळ, कर्नाटक, ओदिशा, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, बिहार व राजस्थानमध्ये पावसामुळे विविध दुर्घटना घडल्या आहेत.

राज्यासह देशात अती पावसामुळे होणाऱ्या दुर्घटना लक्षात घेता संपूर्ण राज्य सरकारांनी सर्वप्रथम रोडच्या खड्ड्यांची दुरूस्ती ताबडतोब करावी व दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक रोडच्या वळणावर आवश्यक ते बोर्ड लावावे व डेंजर झोनच्या ठिकाणी सुरक्षा कर्मचारी तैनात केले पाहिजे.त्याचप्रमाणे वाढत्या पावसाचे प्रमाण पहाता नागरिकांनी व युवकांनी नदी-नाले,तलाव,डोह,धरण व विजांचा लखलखाट यापासून सावधगिरी बाळगली पाहिजे.त्याचप्रमाणे देशात वाढता सेल्फीचा क्रेझ पहाता सेल्फी पॉइंटपासुन सावधगिरी बाळगावी अन्यथा सेल्फीचा क्रेझ महागात पडू शकतो.जय हिंद.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# भक्तिमय वातावरणात आचार्यश्री हेमसागरजी यांचा ४७ वा चातुर्मास कलशस्थापना महोत्सव संपन्न





छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) - सिद्धांत चक्रवर्ती आचार्यश्री १०८ हेमसागरजी गुरुदेव यांच्या ४७ व्या चातुर्मास कलशस्थापना महोत्सवाचा शुभारंभ बुधवारी अत्यंत भक्तिमय, मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. गुरुकृपा तसेच श्रावक-श्राविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर धर्ममय वातावरणाने भारावून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे भगवान जिनेंद्र यांच्या अभिषेकाने तसेच तपस्वी सम्राट आचार्य गुरुवर १०८ सन्मतीसागरजी महाराज यांच्या पूजन-विधानाने झाली. संगीतमय पूजन, आकर्षक पूजाद्रव्यांची सजावट आणि भक्तिभावाने ओतप्रोत भरलेल्या वातावरणामुळे उपस्थित भाविकांना आध्यात्मिक अनुभूती मिळाली. यानंतर आचार्यश्री १०८ हेमसागरजी गुरुदेव यांचे भव्य मंगल आगमन झाले. नवयुवक मंडळ व बहू मंडळाने गुरुवरांचे उत्साहात स्वागत करून कलशस्थापना सोहळ्याची शोभा वाढविली.

यावेळी आचार्यश्री हेमसागरजी गुरुदेव यांनी आपल्या प्रवचनातून चातुर्मासाचे महत्त्व स्पष्ट केले. 'चातुर्मास हा आत्मशुद्धी, संयम, तप, स्वाध्याय आणि धर्मसाधनेचा सुवर्णकाळ आहे. या काळात क्रोध, मान, माया आणि लोभ यांचा त्याग करून नवकार मंत्र, स्वाध्याय, सामायिक, प्रतिक्रमण आणि गुरुवचनांचे आचरण केल्यास जीवन धन्य होते,' असे त्यांनी सांगितले. त्यांच्या प्रेरणादायी प्रवचनामुळे उपस्थित भाविकांना धर्ममार्गावर चालण्याची नवी ऊर्जा मिळाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन चातुर्मास समितीचे मुख्य संयोजक संजय पापडीवाल यांनी केले. त्यांनी आचार्यश्री हेमसागरजी यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देत दिगंबर जैन साधूंच्या चातुर्मासातील साधना, त्यामागील आध्यात्मिक उद्देश तसेच श्रावकांनी या काळात करावयाच्या धार्मिक आचरणाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सुमितभैय्यांच्या मंगलाचरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. महिला मंडळाने सादर केलेले भक्तिमय नृत्य, लहान-मोठ्या मुलांचे सांस्कृतिक सादरीकरण तसेच बहू मंडळाच्या भजन व नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. शैलेश पहाडे व वैशाली पहाडे यांनी भजन व सूत्रसंचालनातून संपूर्ण वातावरण भक्तिरसाने ओथंबून टाकले.

कलशस्थापना सोहळ्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन शैलेन्द्र, अभिषेक, राजेश सेठी व प्रणय सेठी परिवार यांच्या वतीने करण्यात आले. यंदाच्या चातुर्मास कलशस्थापना महोत्सवातील प्रमुख कलशांचा लाभ पुढीलप्रमाणे मिळाला : प्रथम कलश - पूनमचंद विजयकुमार जैन अग्रवाल, द्वितीय कलश - दिनेश, सौ. नीता, केतन व कुनाल सेठी परिवार, तीर्थरक्षा कलश - नितीन माणिकचंद चूडीवाल, आचार्य महावीरकीर्तीजी कलश - कीर्ती व तुषार अजमेरा, आचार्य विमलसागरजी कलश - सुभाषचंद नंदकुमार बोहरा, आचार्य सन्मतीसागरजी कलश - महावीर, प्रकाशचंद व राजेंद्र सेठी परिवार, तर आचार्य हेमसागरजी कलशाचा लाभ श्रीमती कुमकुमदेवी पन्नालाल पापडीवाल, संजय, विजय, प्रशांत, अजय, पियुष व जिनेश पापडीवाल परिवार यांनी घेतला. याशिवाय अनेक गुरुभक्तांनी विविध मंगल कलशांचा लाभ घेत गुरुभक्तीचा आदर्श ठेवला. यावेळी सर्व कलशधारकांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले. चातुर्मासाच्या या मंगल प्रारंभाने धर्म, भक्ती, साधना आणि संस्कारांचा संदेश समाजात दृढ झाला असून आगामी चार महिन्यांत विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडावेत, अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

# लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी लेखा विषयक प्रशिक्षणाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागांतर्गत विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कार्यरत गट 'क' संवर्गातील लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र गट 'क' संवर्ग/लेखा लिपीक पर्यवेक्षीय प्रशिक्षण दिनांक १० ऑगस्ट ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणामध्ये लेखा, वित्तीय कामकाज तसेच शासनाच्या विविध संगणक प्रणालींशी संबंधित विषयांचा समावेश करण्यात आला असून त्यासाठीचा तपशीलवार अभ्यासक्रम छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, बीड आणि धाराशिव येथील जिल्हा कोषागार कार्यालयांमध्ये माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या प्रशिक्षणासाठी इच्छुक शासकीय कर्मचाऱ्यांना प्रवेश दिला जाणार असून, प्रशिक्षणासाठी आवेदनपत्रासोबत संबंधित कार्यालय प्रमुखांचे शिफारसपत्र विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच सर्व शासकीय कार्यालयांतील गट 'क' संवर्गातील इच्छुक तसेच नवनियुक्त कर्मचाऱ्यांना या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येणार असून, विशिष्ट मॉड्यूलसाठी स्वतंत्र प्रवेशाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, बीड आणि धाराशिव जिल्ह्यांतील सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांनी आपल्या कार्यालयातील गट 'क' तसेच लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करावे, असे आवाहन विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# अग्निवीर टेक्निकल व अग्निवीर ट्रेड्समन (शेफ) भरती रॅलीसाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करावेत

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) - १ ईएमई सेंटर, सिकंदराबाद येथे युनिट हेडक्वार्टर कोटा अंतर्गत वर्ष २०२७ साठी अग्निवीर टेक्निकल तसेच अग्निवीर ट्रेड्समन (शेफ) पदांच्या भरतीसाठी रिक्रूटमेंट रॅली आयोजित करण्यात आली आहे. या भरतीसाठी पात्र उमेदवारांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या भरती प्रक्रियेसाठी माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा, युद्ध विधवा तसेच सेवारत सैनिक यांच्या पाल्यांना तसेच स्वतःच्या भावास पात्रतेनुसार अर्ज करता येणार आहे. अग्निवीर ट्रेड्समन (शेफ) पदासाठी किमान इयत्ता दहावी उत्तीर्ण ही शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे.

ही भरती रॅली दि. २९ ऑगस्ट २०२६ ते ११ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत १ ईएमई सेंटर, सिकंदराबाद येथे आयोजित करण्यात येणार आहे.

भरती प्रक्रियेबाबतची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया व इतर सविस्तर माहितीसाठी उमेदवारांनी एचए च्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सिंहस्थातील बस वाहतूक आणि नियोजनासंदर्भात आढावा बैठक संपन्न

नाशिक, दि. ५ (प्रतिनिधी) - सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणात बुधवारी कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बस वाहतूक आणि नियोजनासंदर्भात आढावा बैठक झाली. या बैठकीत कुंभमेळ्यातील भाविकांच्या वाहतुकीसाठी बस संचालन, संपर्क व्यवस्था आणि गतिशीलता नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

**बससेवेच्या नियोजनाचा आढावा**

बैठकीत नाशिक-त्र्यंबकेश्वर, शिर्डी-शनी शिंगणापूर, अहिल्यानगर-शिर्डी, भीमाशंकर, टाकेद, सप्तशृंगी, घृष्णेश्वर आणि कवनई या प्रमुख धार्मिक स्थळांना जोडणाऱ्या मार्गांवरील बससेवेच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. गर्दीच्या तसेच तुलनेने कमी गर्दीच्या कालावधीत बसफेऱ्यांचे नियोजन, ताफ्याची उपलब्धता आणि भाविकांच्या सुरळीत वाहतुकीसाठी आवश्यक कार्यपद्धती यावर चर्चा झाली. नाशिक विमानतळ, रेल्वे स्थानके आणि प्रमुख धार्मिक स्थळांदरम्यान बस संपर्क व्यवस्था अधिक सक्षम करण्याबाबतही बैठकीत विचारमंथन झाले. प्रमुख तीर्थक्षेत्रांसाठी थेट एसटी सेवा सुरू करण्याच्या प्रस्तावाची व्यवहार्यता, विमान व रेल्वेच्या वेळापत्रकाशी बससेवेचे समन्वय, बसथांब्यांची ठिकाणे, प्रवासी सुविधा तसेच विमानतळ व रेल्वे स्थानकांवरील बस पायाभूत सुविधांच्या देखभाल व व्यवस्थापनासंदर्भात विविध बाबींचा आढावा घेण्यात आला.

# ईपीएफ आणि ईपीएसची व्याप्ती वाढली, २५ हजारांपर्यंत 'बेसिक' असणाऱ्यांनाही पेन्शन

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) - कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि निवृत्ती वेतन योजनेची व्याप्ती वाढली असून आता २५ हजारांपर्यंत मूळ वेतन असलेले कर्मचारी या योजनेच्या कक्षेत येणार आहेत. या संदर्भातील प्रस्तावाला केंद्रीय अर्थमंत्रालयाने मंजुरी दिली आहे. लाखो कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार असून त्यांनाही पेन्शन मिळू शकणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर हा निर्णय प्रत्यक्षात लागू होणार आहे.

सध्या १५ हजारांपर्यंत मूळ वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना ईपीएफ आणि निवृत्ती वेतन योजना लागू आहे. त्यापेक्षा जास्त वेतन असलेल्यांसाठी या योजनांमध्ये सहभागी होणे ऐच्छिक आहे. मात्र, आता २५ हजारांपर्यंत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना ईपीएफओचे सदस्य व्हावेच लागणार आहे. ही मर्यादा ३० हजारांपर्यंत नेण्याचा मूळ प्रस्ताव होता. मात्र, शेवटी २५ हजारांवर शिक्कामोर्तब झाले. यापूर्वी २०१४ साली ईपीएफओसाठी वेतनाची मर्यादा साडेसहा हजारांवरून १५ हजार करण्यात आली होती. त्यानंतर जवळपास ११ वर्षांनी त्यात पुन्हा वाढ होणार आहे. खासगी क्षेत्रातील अधिकाधिक कर्मचाऱ्यांना ईपीएफ आणि ईपीएस योजनेत आणून सामाजिक सुरक्षेची व्याप्ती वाढवण्याचा हेतू यामागे आहे.

**कंपन्यांचा खर्च वाढणार**

जास्तीत जास्त कर्मचारी ईपीएफ आणि ईपीएस योजनेत समाविष्ट झाल्यास कंपन्यांचा खर्च वाढणार आहे. नव्याने समाविष्ट झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पीएफ व पेन्शनमध्येही पंपन्यांना योगदान द्यावे लागणार आहे. त्याचबरोबर, कर्मचाऱ्यांना सक्तीने योगदान द्यावे लागणार असल्याने त्यांच्या हातात पडणारा पगार काही प्रमाणात कमी होणार आहे. सध्या कर्मचाऱ्यांच्या पेन्शन फंडमध्ये पंपनी मूळ वेतनाच्या ८.३३ टक्के तर सरकार १.१६ टक्के भर घालते. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात सरकारने पेन्शनसाठी ११,१४४ कोटींची तरतूद केली आहे. त्यामुळे आता पेन्शन योजनेची व्याप्ती वाढल्यानंतर त्यातील सरकारी योगदानही वाढवण्याची शक्यता आहे.

# तुळजाभवानीच्या १,६६८ हेक्टर जमिनींच्या कथित घोटाळ्यावर समिती आक्रमक ; 'तातडीने ताबा घ्या, नाहीतर कोर्टात भेटू!'

पुणे, दि. ५ (प्रतिनिधी) - श्री तुळजाभवानी देवस्थानच्या महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मध्य प्रदेशातील हजारो एकर जमिनींच्या कथित बेकायदेशीर हस्तांतरणाच्या प्रकरणावरून हिंदू जनजागृती समितीने राज्य सरकारला आणि प्रशासनाला कडक कायदेशीर इशारा दिला आहे. देवस्थानाच्या नावे असलेल्या १,६६८.१४ हेक्टर जमिनींचा तातडीने प्रत्यक्ष ताबा मिळवावा, अन्यथा शासन आणि संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरीत्या प्रतिवादी करून उच्च न्यायालयात नवीन जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा समितीने दिला आहे.

पुणे विभागीय आयुक्तांना सादर करण्यात आलेल्या कायदेशीर निवेदनात 'महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम'मधील कलम १८, १९, २१, २२ आणि २२-अ अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर करून देवस्थानाच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**उच्च न्यायालयात याचिका आधीपासून प्रलंबित :** तुळजाभवानी देवस्थानच्या १,६६८.१४ हेक्टर जमिनी आणि कोट्यवधी रुपयांच्या दानपेटी घोटाळ्याप्रकरणी हिंदू जनजागृती समितीची जनहित याचिका (क्र. २१/२०१८) मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात प्रलंबित आहे.

दरम्यान, महसूल मंत्र्यांनी विधानमंडळात दिलेल्या आश्वासनानुसार राज्य शासनाने २० जुलै २०२६ रोजी पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीची स्थापना केली आहे. समितीसमोर हिंदू जनजागृती समितीच्या वतीने ॲड. (पू.) सुरेश कुलकर्णी आणि ॲड. उमेश भडगावकर यांनी सविस्तर कायदेशीर नोटीस सादर केली. छत्रपती शिवाजी महाराजांसह अनेक राजांनी दिल्या होत्या. जमिनी : समितीच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज तसेच विविध हिंदू राजे आणि देशभरातील भाविकांनी श्री तुळजाभवानी देवीला मोठ्या प्रमाणावर जमिनी दान दिल्या होत्या. निजामकालीन गॅझेटिअरमध्येही देवीच्या नावे १,६६८.१४ हेक्टर जमिनींची अधिकृत नोंद असल्याचा दावा करण्यात आला आहे.

मात्र, १९६२ मध्ये मंदिराचे नियंत्रण शासनाकडे आल्यानंतर या जमिनींचे संरक्षण आणि पुनर्प्राप्तीसाठी प्रभावी उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा आरोप समितीने केला आहे. उलट काही जमिनी पूर्वीपासून चार मठांच्या ताब्यात असल्याचे चित्र निर्माण करून मूळ प्रश्नाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

**'फक्त चौकशी नको, प्रत्यक्ष ताबा मिळवा' :**

प्रशासनाने केवळ चौकशी न करता उपलब्ध महसूल नोंदींची सखोल पडताळणी करून बेकायदेशीररीत्या हस्तांतरित झालेल्या जमिनी पुन्हा देवस्थानाच्या नावे नोंदवाव्यात आणि त्यांचा प्रत्यक्ष ताबा मिळवावा, अशी मागणी समितीने केली आहे. यासोबतच ७ जानेवारी २०१० रोजी विधी व न्याय विभागाच्या तत्कालीन सहसचिव एम. जी. गिरटकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालाकडेही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच धाराशिवच्या अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समिती आणि तुळजापूर देवस्थान प्रशासनाकडे यापूर्वीही कायदेशीर आक्षेप नोंदविल्याची माहिती समितीने दिली.

हिंदू जनजागृती समितीने स्पष्ट केले आहे की, देवस्थानाची मालमत्ता सुरक्षित करण्यासाठी तातडीने कायदेशीर कारवाई न झाल्यास संबंधित अधिकारी आणि शासनाला त्यांच्या अधिकृत तसेच वैयक्तिक क्षमतेत प्रतिवादी करून उच्च न्यायालयात नवीन जनहित याचिका दाखल करण्यात येईल.

# गतिमान भूसंपादन करून औद्योगिक विकासाला चालना द्यावी - मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) - राज्यामध्ये नवीन औद्योगिक वसाहतींचा विस्तार वेगाने होत आहे. या विस्तारातूनच औद्योगिक विकास होणार आहे. त्यामुळे उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. गतिमान भूसंपादन करून महाराष्ट्रात औद्योगिक विकासाला चालना द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी येथे दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एमआयडीसीअंतर्गत विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासंदर्भात आढावा बैठक वर्षा निवासस्थान येथे झाली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह,यांच्यासह संबंधित विविध वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, औद्योगिक भूखंड वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी 'मिलाप' या ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज, रिअल-टाईम ट्रॅकिंग, ऑफर लेटर आणि वाटप आदेशांचे स्वयंचलित वितरण; तसेच डॅशबोर्ड सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राज्यात १ हजार१८३ औद्योगिक भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. त्यातून ५ हजार ५०२ कोटींचा महसूल प्राप्त झाला आहे. राज्यात सध्या ६६ हजार ३४३ एकर जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, पुणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, नाशिक आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये ही प्रक्रिया सुरू आहे. राज्यातील ९७ सामंजस्य करारांतर्गत सुमारे ७५ हजार २३४ एकर जमिनीची मागणी आहे. त्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**परवाना प्रक्रिया सुलभ**

- उच्चाधिकार समिती स्तरावरील मंजुरी, विविध प्रशासकीय टप्पे; तसेच वनविषयक परवानग्यांमुळे होणारा विलंब कमी करण्यासाठी प्रक्रिया अधिक सुलभ करावी. उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध व्हावी आणि गुंतवणूक प्रकल्पांना गती मिळावी, यासाठी अनावश्यक प्रशासकीय टप्पे कमी करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मराठवाड्यातील उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण करा;विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री यांच्या विकसित महाराष्ट्र धोरणानुसार मराठवाड्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी औद्योगिक विकासाला चालना देणे अत्यावश्यक असून विभागातील उद्योगांशी संबंधित विविध समस्या तत्परतेने सोडवून उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) संदर्भातील विविध समस्या आणि उपाययोजनांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्याल यात दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी, औद्योगिक संघटना आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत विभागातील एकूण औद्योगिक भूखंड, वाटप झालेली व शिल्लक भूखंड, बंद पडलेल्या उद्योगांची कारणे तसेच औद्योगिक विकासातील अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आणि विविध उद्योजक संघटनांच्या प्रतिनिधींनी सूचना व मते मांडली.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी औद्योगिक विकासाला गती देणे आवश्यक आहे. त्यासाठी उद्योगांशी संबंधित समस्या तातडीने सोडविणे आवश्यक असल्याचे सांगितले. उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मार्फत दर्जेदार तांत्रिक व व्यवहारिक कौशल्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्यासाठी आयटीआय महाविद्यालयांना आवश्यक त्या सर्व सेवा सुविधा पुरविण्यात याव्यात. तसेच औद्योगिक वसाहतींमध्ये रस्ते, पाणी, वीज आणि इतर मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच घनकचरा व्यवस्थापनाचे नियोजन करण्यावर त्यांनी यावेळी प्रमुख भर दिला. तसेच बाहेरून येणारे उद्योग कोणत्याही अडचणींमुळे बंद पडणार नाहीत किंवा जिल्हा सोडून जाणार नाहीत, यासाठी आवश्यक त्या कठोर संरक्षणात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. एमआयडीसी क्षेत्रातील भूखंडाचे वाटप झाल्यानंतर विहित मुदतीत उद्योग सुरू होणे आवश्यक असून, उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या अनावश्यक परवानग्या कमी करून परवानगी प्रक्रिया अधिक सुलभ व वेगवान करण्यावर भर देऊन परवानगी प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत सुरू न झालेल्या उद्योगांबाबत योग्य ती कारवाई करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. उद्योगांच्या विविध समस्या वेळेवर सोडवून त्यांना आवश्यक सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी नियमित आढावा बैठका घेऊन सातत्याने पाठपुरावा करावा, अशा सूचनाही विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी यावेळी दिल्या.

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

**Old Name -** Shaikh Sadiya Abdul Haji
**New Name -** Sadiya Abdul Haji
**Address -** Kiradpura, Lane No- 12 Aurangabad 431001

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

**Old Name -** Maleka
**New Name -** Maleka Shaikh Haji
**Address -** Kiradpura, Lane No- 12 Aurangabad 431001

## सूचना
## महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग

**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : १८.०९.२०२५**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

क्र.टिपीएस-१८२५/अनौसं-३८/प्र.क्र.११७/२०२५/कलम ३७ (१कक) (क) व कलम २०(३)/नवि-१३:-

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख 'उक्त युडीसीपीआर नियमावली' असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिनियम' असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियो. व प्रायो./कलम ३७ (१कक) (ग) व कलम २० (४)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त युडीसीपीआर नियमावली दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त युडीसीपीआर नियमावलीच्या विनियम क्र.६.२.२ मधील तक्ता क्र.६६ मधील अनुक्रमांक ८ येथे स्टेडियम सह पॅव्हेलियिन विकसित करण्यबाबत तरतूद समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त युडीसीपीआर नियमावलीमध्ये या सूचनेसोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकात्मिक क्रिडा संकुल (Integrated Sports Complex) अंतर्गत स्टेडियम, क्रिडांगण, बंदिस्त क्रिडासंकुल यासह सर्व प्रकारच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिडा स्पर्धासाठी आवश्यक ती मोकळी मैदाने । बांधकाम, प्रेक्षक गॅलरी, खेळाडूंची निवासस्थाने, ट्रेनिंग व्यवस्था, अनुषंगीक कर्मचारी निवासस्थाने / कार्यालये या वापरां व्यतिरिक्त काही क्षेत्रावर तारांकित हॉटेल, क्रिडा सुविधा इ. प्रयोजनाकरिता बांधकाम अनुज्ञेय करण्याचे दृष्टीकोनातून उक्त युडीसीपीआर नियमावलीच्या विनियम क्र.६.२.२ मधील तक्ता क्र.६६ मध्ये नवीन तरतुद अनुक्रमांक ९ समाविष्ट करणे तसेच विनियम क्र. ४.२७.५ सुधारित करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे व त्यासाठी उक्त युडीसीपीआर नियमावलीमध्ये सुधारणा करणे आवश्यक झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त फेरबदल' असा करण्यात आलेला आहे);

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) (या) श्र कलम २०(३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्नुषंगिक शक्तीचा वापर करुन, उपत फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शामन ही सुथना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रमि आल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता यमीग्य. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे 'अधिकारी' म्हाणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिकारी' असा करण्यात येत आहे) असे शासनाचे मत झाले आहे;

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नागपूर / नाशिक / अमरावती / छत्रपती संभाजीनगर विभाग.
२. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
४. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापुर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण.
८. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे / नवनगर विकास प्राधिकरणे.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.
१०. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहोल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**स्वाक्षरीत/ -**
**(प्रणव कर्पे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट-अ

**सूचना क्र. टिपीएस-१८२५/अनौसं-३८/प्र.क्र.१९७/२०२५/कलम ३७ (९कक) (क) व कलम २० (३)/नवि-१३**
**दिनांक : १८.०९.२०२५ सोबतचे सहपत्र**

1) The following New Provision at Sr. No.9- "Integrated Sports Complex" is proposed to be added in Table No.6E in the Regulation No.6.2.2 of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) For Maharashtra State As Follows -

**New Provision :-**

Table No.6E

| Sr. No. | Type Of Building | Minimum road width required | Minimum marginal distances | Other stipulations |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 9 | Integrated Sports Complex | 12.0 mtr. | Front - 12.0 m. (only on one major road). 6.0 m. on all remaining sides | i. The minimum area for the Integrated Sports Complex shall be 10 Hect. and such 10 Hect. area shall be situated in one place<br>ii. It shall be mandatory to utilize minimum 70% area of the total area of the Integrated Sports Complex for the purpose of Play Ground / Stadium / Open Grounds / allied constructions for the such uses, Audience Gallery / Residence for Sport Persons or Athlete residency / Training Management and other allied uses such as Workers Residence / Offices / Toilets / Swimming Pool etc.<br>iii. Remaining 30% area of the Integrated Sports Complex shall be utilized and permissible for the uses such as Star Category Hotels, Integrated Stores Facilities / Sports Shops / Mall / Stores / Rest Rooms etc.<br>iv. The maximum permissible FSI allowed for Integrated Sports Complex shall be basic 1.1 & Ancillary FSI allowed.<br>v. In the Development Plan, if any land is reserved or designated for the purpose of Play Ground, stadium and area of such reservation / designation is 10 hector or more, then development or re-development of the "Integrated Sports Complex shall be permissible on the said reservation / designated land.<br>vi. Appropriate Authority for development / redevelopment of the said reservation shall be concerned Municipal Corporation or State Sports Department.<br>vii. Such reservation can also developed jointly by the State Sports Department. and concerned Planning authority.<br>viii. Other provisions for development of Integrated Sports Complex shall be permissible as per the provisions of UDCPR. |

II) The Regulation No. – 4.27.5 in of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) is proposed to be revised as Follows -

| Regulation No. | Sanctioned Provision | Proposed Modification |
|---|---|---|
| 4.27.5 | b) Stadium / Sports Complex - In addition to the uses permissible in playground mentioned above, shops/ offices below the spectators 'tiered gallery may be permitted. Permissible FSI shall be as mentioned in Regulation No. 6.2.2 Table 6-E Sr. No. 8. | b) (i) Stadium / Sports Complex - In addition to the uses permissible in playground mentioned above, shops/ offices below the spectators 'tiered gallery may be permitted. Permissible FSI shall be as mentioned in Regulation No. 6.2.2 Table 6-E Sr. No.9.<br><br>b) (ii) In case of integrated sports complex reservation, permissible FSI and user shall be as per Reg. No 6.2.2, Table 6E serial no. 9 |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**स्वाक्षरीत/ -**
**(प्रणव कर्पे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

## NOTICE
## Government of Maharashtra
## Urban Development Department

**Mantralaya, Mumbai - 032 400**
**Dated: 18.09.2025**

The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966

No.TPS-1825/UOR-38/CR.117/2005/Sec.1)37AA)(a) & Sec./(3)20UD-:13-

Whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) (hereinafter referred to as "the said UDCPR Regulations") for the state except Municipal Corporation of Greater Mumbai, & some Planning Authorities under the provisions of the Maharashtra Regional & Town Planning Act,) 1966hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.TPS-/1818CR./18/238DP. & RP./Sec.1) 37AA) (c) & sec./(4)20UD-13. dated 2020/12/02 and the said UDCPR regulations are come into force from dt.03.12.2020;

And whereas, there is provision No.6.2.2, in the Table No.6E in Sr.No.8 to develop the Stadium with Pavilion in the said Regulation;

And whereas, the Government of Maharashtra is of the opinion that, it is necessary to include a New Provision No.9 in the Table No.6E of Regulation No.6.2.2 & to revised Regulation No.4.27.5 of the said UDCPR Regulation in respect of the Integrated Sports Complex for the purpose of Stadium. Play Grounds, Indoor Sports Complex, Open Grounds. Buildings required for the National and International Level Sports Competitions, Spectator Galleries, Accommodation for Players. Training Facilities. Residential Quarters/Offices on the specific area etc. and in addition to these uses, it is also necessary to permit construction on some part of the area for Star Category Hotels, Sports-related facilities, etc. and for that purpose it is necessary to modify the said UDCPR Regulation. as mentioned in Schedule -A appended with this notice (hereinafter referred to as "the said Modification Proposal") :

Now therefore, in exercise of the powers conferred under section 37(IAA)(a) and 20(3) of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes a notice for inviting suggestions/objections from general public in respect to the said modification. Any objections/suggestions upon the said modification shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette, to the concerned Divisional Joint Director of Town Planning who is hereby authorised as "an Officer" to hear objections/ suggestions and say of concerned Planning Authorities, as applicable, and submit his report to the Government (hereinafter referred to as "the said Officer").

This notice is kept for inspection to the general public in the following offices for the period of one month on all working days.

1. The Divisional Joint Director of Town Planning, Konkan/Pune/Nagpur/Nashik / Amravati /Chhatrapati Sambhaji Nagar Division.
2. The Commissioners All concerned Municipal Corporations. (Except.Brihinmumbai Municipal Corporation)
3. The Collectors. All Districts.
4. The Metropolitan Commissioners, All Metropolitan Regions Developments Authorities.
5. Office of the Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, Belapur, Navi Mumbai.
6. Office of the Vice Chairman and Managing Director, Maharashtra Airport Development Company Ltd., 8 Floor. World Trade Centre, Mumbai-.5
7. The Chief Executive Officer, Kolhapur Urban Area Development Authority, Kolhapur.
8. All Special Planning Authorities New Town Development Authorities.
9. The Chief Executive Officer, All Zilla Parishads.
10. The Chief Officers, All Municipal Councils/Nagar Panchyats.

This notice is also available on the Government website www.maharashtra.gov.in (Acts/Rules)

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**Sd/-**
**(Pranav Karpe)**
**Under Secretary to Government**

## Schedule-A

**Accompaniment of Notice No.TPS-1825/UOR-38/CR.117/2025/Sec.37(1AA) (a) & Sec.20(3)/ UD-13, dated: 18.09.2025**

11) The following New Provision at Sr. No.9- "Integrated Sports Complex" is proposed to be added in Table No.6E in the Regulation No.6.2.2 of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) For Maharashtra State As Follows -

New Provision:-

Table No.6E

| Sr. No. | Type Of Building | Minimum road width required | Minimum marginal distances | Other stipulations |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 9 | Integrated Sports Complex | 12.0 mtr. | Front - 12.0 m. (only on one major road). 6.0 m. on all remaining sides | i. The minimum area for the Integrated Sports Complex shall be 10 Hect. and such 10 Hect. area shall be situated in one place<br>ii. It shall be mandatory to utilize minimum 70% area of the total area of the Integrated Sports Complex for the purpose of Play Ground / Stadium / Open Grounds / allied constructions for the such uses, Audience Gallery / Residence for Sport Persons or Athlete residency / Training Management and other allied uses such as Workers Residence / Offices / Toilets / Swimming Pool etc.<br>iii. Remaining 30% area of the Integrated Sports Complex shall be utilized and permissible for the uses such as Star Category Hotels, Integrated Stores Facilities / Sports Shops / Mall / Stores / Rest Rooms etc.<br>iv. The maximum permissible FSI allowed for Integrated Sports Complex shall be basic 1.1 & Ancillary FSI allowed.<br>v. In the Development Plan, if any land is reserved or designated for the purpose of Play Ground, stadium and area of such reservation / designation is 10 hector or more, then development or re-development of the "Integrated Sports Complex shall be permissible on the said reservation / designated land.<br>vi. Appropriate Authority for development / redevelopment of the said reservation shall be concerned Municipal Corporation or State Sports Department.<br>vii. Such reservation can also developed jointly by the State Sports Department. and concerned Planning authority.<br>viii. Other provisions for development of Integrated Sports Complex shall be permissible as per the provisions of UDCPR. |

II) The Regulation No. – 4.27.5 in of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) is proposed to be revised as Follows -

| Regulation No. | Sanctioned Provision | Proposed Modification |
|---|---|---|
| 4.27.5 | b) Stadium / Sports Complex - In addition to the uses permissible in playground mentioned above, shops/ offices below the spectators 'tiered gallery may be permitted. Permissible FSI shall be as mentioned in Regulation No. 6.2.2 Table 6-E Sr. No. 8. | b) (i) Stadium / Sports Complex - In addition to the uses permissible in playground mentioned above, shops/ offices below the spectators 'tiered gallery may be permitted. Permissible FSI shall be as mentioned in Regulation No. 6.2.2 Table 6-E Sr. No.9.<br><br>b) (ii) In case of integrated sports complex reservation, permissible FSI and user shall be as per Reg. No 6.2.2, Table 6E serial no. 9 |

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**Sd/-**
**(Pranav Karpe)**
**Under Secretary to Government**

विमाका/छत्रपती संभाजीनगर/जाहि/७८/२०२६